**कौशल्य, रोजगार, उद्योजकता यांचेसोबत नाविन्यतेस चालना देण्यासाठी “जिल्हा नाविन्यता परिषद” ऐवजी “कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समिती”च्या सुधारित रचनेबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य, रोजगार ,उद्योजकता व नाविन्यता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : कौविउ-२०२१/प्रक्र.३८/उद्योजकता (कौ.१)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १७ जून, २०२२.

<u>वाचा:-</u> १) नियोजन विभाग, शा. नि. क्र.एसआयसी-२११३/प्र.क्र.१/२०१३/१४७१,दि.०४.०३.२०१४.
२) नियोजन विभाग, शा. नि. क्र.जिनाप-२११४/प्र.क्र.२/२०१४/१४७१,दि.१४.०८.२०१४.
३) नियोजन विभाग, शा. नि. क्र.रानाप-४०१५/प्र.क्र.२७/का.१४२१,दि.२०.०२.२०१६.
४)कौ. वि. व उ. विभाग, शा.नि. क्र.कौविउ-२०१६/ प्र.क्र.७४/अभियान-१,दि.२१.०६.२०१६.
५) कौ. वि. व उ. विभाग, शा.नि. क्र.कौविउ-२०१६/ प्र.क्र.७७/अभियान-१,दि.०३.०७.२०१७.
६) कौ.वि.व उ. विभाग, शा.नि. क्र.कौविउ-२०१९/ प्र.क्र.९६/अभियान-१, दि.२७ मे, २०२०.

<u>प्रस्तावना:-</u>

केंद्र शासनाच्या “नॅशनल इनोव्हेशन कौन्सिलने” केलेल्या शिफारशीनुसार, संदर्भ क्र.१ येथील नियोजन विभागाच्या शासन निर्णयान्वये, राज्यामध्ये “स्टेट इनोव्हेशन कौन्सिलची” स्थापना करण्यात आली.

“स्टेट इनोव्हेशन कौन्सिलचे” काम अधिक प्रभावीपणे होण्यासाठी जिल्हा, ग्रामीण स्तरावर जागृती करणे आवश्यक होते. त्यानुषंगाने संदर्भ क्र.२ येथील नियोजन विभागाच्या शासन निर्णयान्वये स्टेट इनोव्हेशन कौन्सिलला सहाय्यभूत ठरेल अशी जिल्हा स्तरावर, “जिल्हा नाविन्यता परिषद” (DIC) स्थापना करण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र.४ येथील विभागाच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य नाविन्यता परिषद व त्या अंतर्गत येणारे सर्व उपक्रम नियोजन विभागाकडून कौशल्य, रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या कार्यकक्षेत आणण्यात आले आहेत तसेच संदर्भ क्र.५ येथील विभागाच्या शासन निर्णयान्वये, गठीत करण्यात आलेल्या विविध समित्यांचे पुनर्गठन करून सदर संस्थेचे नाव “महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी” (Maharashtra State Innovation Society- MSInS) असे करण्यात आले आहे.

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये नाविन्यतेस चालना देण्यासाठी पूरक वातावरण निर्मिती करणे व त्यासाठी आवश्यक सर्व सहाय्य करणे, जिल्ह्यांनी या क्षेत्रांमध्ये केलेली कामगिरी व उपक्रम याबद्दलची दखल घेणे, त्यांचे मूल्यमापन करणे तसेच जिल्ह्यांना प्रोत्साहित करून सर्वांगीण विकासासाठी निकोप स्पर्धात्मकता निर्माण करणे याकरीता, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी व जिल्हास्तरावरील संबंधित अंमलबजावणी यंत्रणा यांच्यात सुसंवाद व सनियंत्रण असणे आवश्यक आहे.

सबब, नियोजन विभागाकडून मिळालेल्या मान्यतेनंतर जिल्हा नाविन्यता परिषद आणि परिषदेअंतर्गत येणारे सर्व उपक्रम नियोजन विभागाच्या कार्यकक्षेतून कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या कार्यकक्षेत आणण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

या शासन निर्णयान्वये, नियोजन विभागाचा शासन निर्णय क्र.जिनाप-२११४/प्र.क्र.२/२०१४/१४७१, दि.१४.०८.२०१४ अधिक्रमित करण्यात येत असून त्याद्वारे स्थापित केलेली "जिल्हा नाविन्यता परिषद" बरखास्त करण्यात येत आहे.

२. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये कौशल्य, रोजगार, उद्योजकता यांचेसोबत नाविन्यतेस चालना देण्यासाठी, विभागाच्या शासन निर्णय क्र.कौविउ-२०१९/ प्र.क्र.९६/अभियान-१, दि.२७ मे, २०२० अन्वये स्थापित केलेल्या कौशल्य विकास जिल्हा कार्यकारी समितीचे नाव, रचना व कार्यकक्षा यामध्ये सुधारणा करण्यात येत आहे.

३. यापुढे राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये कौशल्य, रोजगार, उद्योजकता यांचेसोबत नाविन्यतेस चालना देण्यासाठी "कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समिती"ची रचना खालीलप्रमाणे राहील:-

| अ.क्र. | पदाधिकारी | समितीतील पद |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | उपाध्यक्ष |
| ३. | आयुक्त, महानगरपालिका/ मुख्याधिकारी, नगरपालिका | सदस्य |
| ४. | जिल्हा नियोजन अधिकारी | सदस्य |
| ५. | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र | सदस्य |
| ६. | व्यवस्थापक,जिल्हा अग्रणी बँक | सदस्य |
| ७. | प्रकल्प संचालक, आत्मा | सदस्य |
| ८. | कृषी विज्ञान केंद्राचे प्रतिनिधी | सदस्य |
| ९. | प्राचार्य, जिल्हास्तरीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) | सदस्य |
| १०. | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) | सदस्य |
| ११. | जिल्हा कामगार अधिकारी | सदस्य |
| १२. | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | सदस्य |
| १३. | महिला आर्थिक विकास महामंडळ (MAVIM) चे प्रतिनिधी | सदस्य |
| १४. | महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) चे प्रतिनिधी | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| १५. | शासकीय/ महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी मार्फत संचालित/ खाजगी इन्क्युबेशन सेंटरचे प्रतिनिधी (०१) | सदस्य |
| १६. | जिल्ह्यातील मान्यताप्राप्त स्टार्टअप्सचे प्रतिनिधी (०२) | सदस्य |
| १७. | जिल्ह्यातील उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी (०३). त्यापैकी महिला प्रतिनिधी (०१) | सदस्य |
| १८. | महात्मा गांधी नॅशनल फेलोज आणि जिल्हा कौशल्य विकास समन्वयक | सदस्य |
| १९. | सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र | सदस्य सचिव |

अ. संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे या समितीचे अध्यक्ष असतील तसेच सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र हे सदर समितीचे सदस्य सचिव असतील.

आ. समिती अध्यक्ष हे आवश्यकतेनुसार खालील निमंत्रितांना बैठकीस आमंत्रित करु शकतात.

| अ.क्र. | पदाधिकारी | समितीतील पद |
|---|---|---|
| १. | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी यांनी नामनिर्देशित केलेला महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी चा प्रतिनिधी (०१) | निमंत्रित |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांनी नामनिर्देशित केलेला महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी चा प्रतिनिधी (०१) | निमंत्रित |
| ३. | विविध धारांच्या (Streams) पदविका/ पदवी / पदवीत्त्युर महाविद्यालयांचे प्राचार्य | निमंत्रित |
| ४. | सक्रिय बचतगटांचे प्रतिनिधी | निमंत्रित |
| ५. | कला / विज्ञान /सामाजिक कार्य या क्षेत्रातील नामांकित व्यक्ती | निमंत्रित |
| ६. | जिल्हा युवा समन्वयक, नेहरु युवा केंद्र संघटन | निमंत्रित |
| ७. | आवश्यकतेनुसार एखाद्या विषयासंबंधीचे तज्ञ (कमाल ०२ सदस्य) | निमंत्रित |

इ. महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीची जिल्हास्तरावरील “नोडल एजन्सी” म्हणून काम पाहताना कौशल्य, रोजगार, उद्योजकता या क्षेत्रांसोबत नाविन्यता या क्षेत्राच्या प्रगतीचा देखील आढावा घेण्याची जबाबदारी या समितीकडे राहील.

ई. सदस्य सचिवांना कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यतेसंदर्भातील कामकाजासाठी तांत्रिक/ संगणकीय इ. बाबींमध्ये सर्वतोपरी सहाय्य करण्यासाठी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सल्लागार/ संगणकीय सहाय्यक उपलब्ध करुन घेण्याची जिल्हाधिकाऱ्यांना मुभा असेल.

४. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समितीची कार्ये पुढील प्रमाणे राहतील.

**<u>अ. कौशल्य व रोजगार विषयक कार्ये :-</u>**

१. केंद्र, राज्य व जिल्हा नियोजन समितीमार्फत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांच्या भौतिक / आर्थिक प्रगतीबाबतचा आढावा घेणे व त्यांची जिल्हा स्तरावर अंमलबजावणी करणे. ( उदाहरणार्थ : प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना, STRIVE,

SANKALP, Skill India,जनशिक्षण संस्थान, ॲप्रेंटिसशीप योजना, POTS-प्रॉडक्शन ओरिएंटेशन ट्रेनिंग स्कीम इ.)

२. जिल्हा कौशल्य विकास आराखडा (District Skill Development Plan) वेळोवेळी अद्ययावत करुन तो महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीकडून मंजूर करुन घेणे आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे.

३. केंद्र/राज्य शासनाकडून कौशल्य विकास कार्यक्रमाबाबत वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करणे व आढावा घेणे.

४. जिल्हास्तरीय किमान कौशल्य विकास कार्यक्रमाचा तिमाही अहवाल आयुक्त, कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता आयुक्तालय यांचेमार्फत शासनास सादर करणे.

५. कौशल्य विकास कार्यक्रमात स्थानिक संस्था जसे की, पंचायत राज संस्था (PRIs), स्थानिक शहरी निकाय (ULBs), बिगर शासकीय संघटना (NGOs) इत्यादींचा सहभाग वाढविणे. (महिला आर्थिक विकास महामंडळाच्या (माविम) योजना, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), समाजकल्याण, आदिवासी विभागांमार्फत संचालित योजना इ. यासारख्या कौशल्य व रोजगारासंबंधीच्या योजनांचा आढावा घेणे.)

६. रोजगार/स्वयंरोजगाराची मागणी आणि पुरवठा यांचा आढावा घेणारी जिल्हास्तरीय यंत्रणा कार्यक्षम करणे, औपचारिक आणि अनौपचारिक ह्या दोन्ही क्षेत्रांमध्ये कामगार बाजाराचा कल ओळखणे.

७. कौशल्य विकास कार्यक्रमातील सहभागी प्रशिक्षण संस्था/तज्ञ/मूल्यमापक संस्थांना अचानक भेटी देऊन कार्यक्रमाची योग्य अंमलबजावणी होत असल्याची खात्री करणे.

८. मोठ्या उद्योगांशी चर्चा करुन औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये उद्योग सुसंगत प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम (Industry relevant Syllabus) लागू करणे.

९. जिल्ह्यातील नामवंत उद्योग / व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांचा वापर सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठीच्या प्रशिक्षणासाठी करणे.

१०. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील IMC चा तिमाही आढावा घेणे, अकार्यक्षम IMC चे सदस्य बदलणे, IMC अध्यक्ष व प्रतिनिधी यांचे नामनिर्देशन करणे.

११. केंद्र/राज्य स्तरावरुन प्राप्त होणाऱ्या निधीचा विनियोग करणे व उपयोगाचा आढावा घेणे.

१२. विविध प्रसार माध्यमांमार्फत कौशल्य व रोजगाराच्या कार्यक्रमांना जिल्हा स्तरावर प्रसिध्दी देणे.

१३. प्रोत्साहनात्मक बाब म्हणून, जिल्ह्यामध्ये कौशल्य व रोजगाराभिमुख योजनांच्या प्रचार व प्रसारासाठी केलेल्या गौरवपूर्ण कामाची दखल म्हणून व्यक्ती / संस्था यांना सन्मानपत्र प्रदान करणे.

१४. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या दिनांक २० ऑगस्ट २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार जिल्हास्तरावरील कौशल्य विषयक योजनांचे एकसुत्रीकरण करण्यास चालना देणे.

**ब. उद्योजकता व नाविन्यता विषयक कार्ये:-**

१. महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीचा कार्यक्रम जिल्हास्तरावर प्रभावीपणे राबविणे.

२. जिल्हा स्तरावरील नव्या संकल्पनांकरिता पूरक वातावरण निर्मिती करणे.

३. जिल्ह्याकरीता नवीन संकल्पनांचा आराखडा (District Innovation Plan) वेळोवेळी अद्ययावत करुन तो महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीकडून मंजूर करुन घेणे आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे.

४. ग्रामीण स्तरावरील स्थानिक कौशल्ये तसेच नवीन संकल्पना शोधून त्यांना मूर्तरूप देण्यासाठी संबंधितांना प्रोत्साहित करणे, मार्गदर्शन करणे तसेच बक्षीस पात्र संकल्पनांची निवड करून त्यांना शिष्यवृत्ती, आर्थिक सहाय्य तथा बक्षिसे देऊन त्यांचा गौरव करणे.

५. स्थानिक शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, ITIs, Tinkering Labs, Incubation Centres, संशोधन व विकासात्मक संस्थेतील विद्यार्थी तथा तरुण बुद्धीजीवी वर्गाला मार्गदर्शन करण्याकरिता सेमिनार / कार्यशाळा व व्याख्याने आयोजित करणे. प्रत्येक महाविद्यालयात / ITI मध्ये नाविन्यता कक्षाची स्थापना करणे आणि त्याद्वारे जिल्ह्यातील नवउद्योजक तसेच स्टार्टअप्सना मार्गदर्शन करणे.

६. जिल्ह्यातील स्थानिक उद्योगांना प्रोत्साहित करणे.

७. जिल्हा प्रशासनात नाविन्यता आणण्यासाठी नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणे.

८. जिल्हास्तरावर स्टार्टअप यात्रा, स्टार्ट अप वीक, बूट कॅम्प सारखे उपक्रम राबविणे.

९. जिल्ह्यातील स्टार्टअप्स/ सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग यांची यादी ठेवणे व त्यांच्याशी संपर्कात राहून योग्य मदत व पाठबळ पुरवणे.

१०. जिल्ह्याच्या खरेदी प्रक्रियेत स्टार्टअप्स यांना प्राधान्य देण्यास सहकार्य करणे.

११. ग्रामीण भागातील उद्योजक, महिला उद्योजकांना प्रोत्साहन देणे, महिला उद्योजकांना प्रोत्साहन देणाऱ्या हिरकणीसारख्या कार्यक्रमांचे आयोजन करणे. प्रत्येक महाविद्यालयात / ITI मध्ये महिला उद्योजकता कक्षाची स्थापना करणे आणि त्याद्वारे सर्व स्तर व वयोगटातील महिलांना उद्योजकतेसाठी मार्गदर्शन व आवश्यक ते सहाय्य करणे.

१२. स्टार्टअप्सना क्वालिटी टेस्टिंग, पेटंटसाठी सहाय्य करणे.

१३. स्टार्टअप / इनोव्हेटर / नवीन कल्पना असणाऱ्या नागरिकांना जिल्हा विभागांमार्फत संस्थात्मक सहाय्य प्रदान करणे.

१४. विविध प्रसार माध्यमांमार्फत उद्योजकता व नाविन्यतेच्या कार्यक्रमांना जिल्हा स्तरावर प्रसिध्दी देणे.

१५. प्रोत्साहनात्मक बाब म्हणून, जिल्ह्यामध्ये नाविन्यपूर्ण योजनांच्या प्रचार व प्रसारासाठी केलेल्या गौरवपूर्ण कामाची दखल म्हणून व्यक्ती / संस्था यांना सन्मानपत्र प्रदान करणे.

५. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समितीची बैठक दर महिन्याला एकदा आयोजित करण्यात यावी तसेच सदर बैठक ही दोन भागांमध्ये विभागण्यात यावी. प्रथम भागात कौशल्य व रोजगार आणि द्वितीय भागात उद्योजकता व नाविन्यता संबंधित विषयांवर चर्चा व्हावी.

६. या समितीच्या दर महिन्याला होणाऱ्या बैठकीसाठी दिवस निश्चित करावा जेणेकरुन संबंधितांना बैठकीसाठी पूर्वतयारी करता येईल. (उदा. महिन्यातील प्रथम / तृतीय शनिवार)

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक सांकेतांक क्र. २०२२०६१७१२१०४२५६०३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANISHA VERMA

Digitally signed by MANISHA VERMA
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SKILL DEVELOPMENT ENTREPRENEURSHIP AND EMPLOYMENT DEPARTMENT, 2.5.4.20=c2db39887c1911b725a77fd36389bdd5b364615fedb75d9c0838ff98c4d7faed, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AD13940CD46B998D221871156F32C2EE899EE8FE4333BF32214366A4AF3741DA, cn=MANISHA VERMA
Date: 2022.06.17 12:13:24 +05'30'

**(मनिषा वर्मा)**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. सभापती, विधानपरिषद,विधानमंडळ, मुंबई.
५. मा. अध्यक्ष, विधानसभा,विधानमंडळ, मुंबई.
६. सर्व मा.मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानमंडळ, मुंबई.
८. सर्व मा. संसद सदस्य / विधानसभा सदस्य / विधान परिषद सदस्य
९. मा.मुख्य सचिव यांचे वरीष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१०. सर्व अ.मु.स./ प्र.स. / सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र, मुंबई.

१२. महालेखापाल (लेखा परिक्षा ),महाराष्ट्र, मुंबई.

१३. सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य.

१४. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, नवी मुंबई.

१५. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

१६. सर्व जिल्हाधिकारी / मुख्य कार्यकारी अधिकारी / जिल्हा पोलिस अधिक्षक

१७. निवड नस्ती (कौशल्य १ )